मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडच्या 15 टक्के पाणी कपातीबाबत मोठा निर्णय!

## पवना धरणातील पाणीसाठा 76.49 टक्क्यांवर पोहोचला असला तरी पिंपरी-चिंचवडकरांची पाणी कपातीतून तूर्तास सुटका होणार नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलै महिन्याच्या पहिल्या आठ दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठा वाढल्याने पिंपरी-चिंचवड शहरात १९ जूनपासून सुरू असलेली १५ टक्के पाणी कपात रद्द होण्याची अपेक्षा शहरवासीयांना होती. मात्र, पावसाने मागील आठ दिवसांपासून घेतलेल्या विश्रांतीमुळे महापालिकेने १५ टक्के पाणी कपातीचा निर्णय कायम ठेवला आहे. पवना धरणात ७६.४९ टक्के पाणीसाठा झाला असला, तरी एल निनोचा प्रभाव कमी झाला नाही. त्यामुळे पाण्याचे आतापासूनच नियोजन करून काटकसरीने वापर करण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेला केली आहे.



समन्यायी पाणी वाटपाचे कारण देत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू केला. तो साडेसहा वर्षांनंतरही कायम आहे. अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याची नागरिकांची सातत्याने ओरड सुरू आहे. असे असतानाच जूनमध्ये पावसाने ओढ दिली. संपूर्ण महिना कोरडा गेला. पवना धरणातील पाणीसाठा १६ टक्क्यांवर आला होता. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या सुचनेनुसार महापालिकेने १९ जूनपासून १५ टक्के पाणी कपात लागू केली. महापालिका पवना धरणातून ५५० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी उचलत होती. कपातीनंतर ४७५ दशलक्ष लीटर पाणी दैनंदिन मिळू लागले. आंद्रा धरण आणि एमआयडीसीकडून घेण्यात येणाऱ्या पाण्यामध्येही १५ टक्के कपात झाली. पाण्याच्या वेळेमध्ये कपात केल्यानंतर शहराच्या विविध भागांतून विस्कळीत पाण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली.

जुलै महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने धरण आणि पिंपरी-चिंचवड परिसरात जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे शहरातून वाहणाऱ्या मुळा, पवना आणि इंद्रायणी नदीला पूर आला. पवना धरणातील पाणीसाठ्यात ४ जुलैपर्यंत २७.६२ टक्के पाणीसाठा झाला होता. ५ आणि ६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणात ५० टक्के पाणीसाठा झाला. नदी, नाले, ओढ्यांमधून धरणात येवा सुरू असून, ७६.४९ टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे पाणी कपात रद्द करण्याची मागणी नगरसेवकांनी केली होती. मात्र, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्र पाठवून सुरू असलेली पाणी कपात कायम ठेवावी, अशी सूचना केली आहे. त्यानुसार शहरात अद्यापही १५ टक्के पाणी कपात कायम आहे.शहरात सुरू असलेली १५ टक्के पाणीकपात कायम आहे. ऑक्टोबरपर्यंत धरणात शंभर टक्के पाणीसाठा असेल तरच १५ टक्के पाणी कपात रद्द केली जाईल.

### १५% पाणीकपात कायम

» **पिंपरी-चिंचवड शहरात १९ जूनपासून लागू असलेली १५ टक्के पाणीकपात अद्याप कायम ठेवण्यात आली आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठा ७६.४९ टक्क्यांवर पोहोचला असला तरी एल निनोच्या संभाव्य परिणामामुळे जलसंपदा विभागाने पाणी वापरात काटकसर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेने पाणीकपात रद्द न करता ती सुरूच ठेवली आहे. पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना पुढील काही महिन्यांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.**

# मोशी दुर्घटनेची राष्ट्रीय आयोगांकडून गंभीर दखल; PCMC आयुक्तांना नोटीस

## पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांना पंधरा दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा नाहक बळी गेला आहे. त्या दुर्घटनेची राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगानी दखल घेतली आहे

दोन्ही आयोगांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच, समाज कल्याण आयुक्त आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांना नोटिसा बजावली आहे. त्याप्रकरणी पंधरा दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



दोन्ही आयोगांनी नोटिशीत दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्व कामगारांची संपूर्ण माहिती, त्यांचा सामाजिक प्रवर्ग, संबंधित पोलिस एफआयआर, शवविच्छेदन अहवाल, पंचनामा तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मृतांच्या वारसांना मंजूर करण्यात आलेली आर्थिक मदत व नुकसानभरपाईचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.या प्रकरणात नोंदविण्यात आलेले गुन्हे, दोषींविरुद्ध करण्यात आलेली फौजदारी व प्रशासकीय कारवाई, तपासाची सद्यस्थिती तसेच, पुढील प्रस्तावित कारवाईचा अहवालही मागविण्यात आला आहे.

याशिवाय, दुर्घटनेस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीची सखोल चौकशी, संबंधित विभाग व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही, भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सविस्तर अहवालही आयोगांनी सादर करण्यास सांगितले आहे.

मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात याव्यात, या उद्देशाने दोन्ही राष्ट्रीय आयोगांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित प्रशासनाला निर्धारित मुदतीत सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# मोशी दुर्घटनेनंतर कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा

## कासारवाडी केंद्राचा कोंडला श्वास; प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग, घंटागाड्या, कंटेनर, कॉम्पॅक्टरच्या रांगा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपोवरील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील कचऱ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील कचरा संकलन, कचऱ्याचे विलगीकरण आणि प्रक्रिया व्यवस्थापनाचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

मोशी कचरा डेपो बंद असल्याने या विस्कळीत व्यवस्थेचा थेट फटका कासारवाडी येथील महापालिकेच्या घनकचरा हस्तांतरण केंद्राला बसत आहे. क्षमतेपेक्षा जास्त कचऱ्याची आवक वाढल्याने या केंद्राचा अक्षरशः 'श्वास कोंडला' आहे.

कासारवाडी येथील घनकचरा हस्तांतरण केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळच कचऱ्याचे मोठमोठे ढीग साचले आहेत. परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र आहे.

मोशी कचरा डेपोवरील दुर्घटनेनंतर शहराच्या कचरा व्यवस्थापनातील त्रुटी उघड झाल्या आहेत. कचरा संकलन, विलगीकरण, वाहतूक आणि प्रक्रिया यासाठी सक्षम पर्यायी व्यवस्था उभी करण्याची गरज असताना, सध्या कासारवाडी केंद्रावरच कचऱ्याचा भार वाढत आहे.

मोशी डेपो तातडीने सुरू करावा, कासारवाडी केंद्रातील साचलेला कचरा युद्धपातळीवर हटवावा आणि संपूर्ण कचरा व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन नव्याने करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

या गंभीर समस्येबाबत ह क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य अधिकारी अंकुश झिटे तसेच महापालिकेचे आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रदीप ठेंगल यांच्याशी फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

कासारवाडी येथील घरगुती घातक कचरा प्रक्रिया केंद्रही बंद अवस्थेत दिसून आले. त्यामुळे कचरा संकलनापासून विलगीकरण आणि पुढील प्रक्रियेपर्यंतची संपूर्ण साखळीच विस्कळीत झाल्याचे स्पष्ट होत आहे.

मोशी कचरा डेपो बंद असल्याने शहरातील कचरा इतर ठिकाणी वळविला जात आहे. मात्र, उपलब्ध कचरा संकलन व हस्तांतरण केंद्रांची क्षमता मर्यादित असल्याने कासारवाडी केंद्रावर अतिरिक्त भार पडत आहे. कचरा वेळेत पुढे वाहून न गेल्याने केंद्राच्या परिसरातच कचऱ्याचे ढीग वाढत आहेत. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात कचरा साचल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेबरोबरच आरोग्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे.



### नियोजनाचा अभाव की तात्पुरती व्यवस्था?

**» मोशी येथील दुर्घटनेनंतर कचरा व्यवस्थापनाची पर्यायी व्यवस्था करण्यात आली असली तरी, त्यासाठी आवश्यक असलेली क्षमता, वाहतूक आणि प्रक्रिया यंत्रणा अपुरी पडत असल्याचे सध्याच्या परिस्थितीतून दिसून येत आहे. परिणामी शहरातील कचरा व्यवस्थापनाची यंत्रणा एका डेपोवर अवलंबून असल्याचेही उघड झाले आहे..**

### ओला-सुका कचरा एकत्र

**» शहरातील विविध भागांतून घरोघरी कचरा गोळा करणाऱ्या अनेक घंटागाड्या कचऱ्याने पूर्ण भरलेल्या अवस्थेत उभ्या होत्या. विशेष म्हणजे, या वाहनांमध्ये ओला आणि सुका कचरा सर्रासपणे एकत्र टाकला जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे कचरा विलगीकरणाच्या संकल्पनेलाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे.कचरा पुढे वाहून नेणारे मोठे कंटेनर आणि कॉम्पॅक्टर गाड्याही जागेवरच थांबून होत्या. केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ कचऱ्याचा मोठा ढीग साचल्याने वाहनांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. एका कॉम्पॅक्टर मशीनवरही कचरा तसाच पडून असल्याचे दिसून आले.**

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न

**» कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात कचरा साचल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेबरोबरच आरोग्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे.**

# 'एक दिवस शाळेसाठी' उपक्रमातून 1.13 लाख विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांची जनजागृती

## 31 टप्प्यांत 502 शाळांपर्यंत पोहोचला उपक्रम; रस्ते सुरक्षा, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या "एक दिवस शाळेसाठी" या जनजागृती उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा, वाहतूक नियम, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

वाहतूक शाखेमार्फत १६ जुलै रोजी ३१ व्या टप्प्यात १५ टीममधील १२ अधिकारी व १८ अंमलदार यांनी शहरातील १४ शाळांना भेट देऊन सुमारे १,८३५ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत ३१ टप्प्यांमध्ये ५०२ शाळांमधील तब्बल १ लाख १३ हजार १७१ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून वाहतूक आणि नागरी जबाबदाऱ्यांबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करून जबाबदार नागरिक घडविण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे वाहतूक विभागाने सांगितले. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपआयुक्त किशोर देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेता हा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्यात



### उपक्रमाची ठळक आकडेवारी

**» पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेच्या "एक दिवस शाळेसाठी" या उपक्रमाने जनजागृतीचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. आतापर्यंत ३१ टप्प्यांत ५०२ शाळांमध्ये जाऊन तब्बल १ लाख १३ हजार १७१ विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ते सुरक्षा आणि नागरी जबाबदाऱ्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे. १६ जुलै रोजी झालेल्या ३१ व्या टप्प्यात १५ पथकांतील १२ अधिकारी आणि १८ अंमलदारांनी १४ शाळांमध्ये भेट देत १,८३५ विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद पाहता हा उपक्रम पुढेही सुरू राहणार आहे.**

# बांधकाम परवानगीसाठी आता ‘एपीआय’ प्रणाली !

## वास्तूविशारदाचा आराखडा आणि विकास आराखड्याची पडताळणी ऑनलाईन होणार; वेळ आणि मनुष्यबळाची मोठी बचत

**पुणे | प्रतिनिधी**

बांधकाम परवानगी प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी महापालिकेने राज्य सरकारच्या भूमी अभिलेख विभागाच्या मदतीने ‘ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस’ (एपीआय) आधारित प्रणाली लागू करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. बाणेर, कोथरूड भागात प्रायोगिक तत्त्वावर हा प्रयोग राबविला जाणार आहे. त्यासाठी स्थायी समितीने मान्यता दिल्याची माहिती समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

भिमाले म्हणाले, ‘जमाबंदी आयुक्त तथा भूमी अभिलेख विभागाचे संचालक आणि महापालिका आयुक्त यांच्यामध्ये ३ जुलै रोजी करार झाला. त्यानुसार ही प्रणाली महापालिकेच्या दोन भागांत राबविली जाणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून बांधकाम परवानगी जीआयएस-अॅज-अ-सर्व्हिस तंत्रज्ञानाचा वापर करून भूखंडाचे जिओ-रेफरन्सिंग, विकास आराखडा, डीपी झोनिंग आणि इतर नोंदी यांची एकत्रित पडताळणी केली जाणार आहे.

त्यानंतर अर्जदाराला प्रमाणित स्थानिक अहवाल उपलब्ध करून दिला जाईल. त्यामुळे अर्जदाराला विविध परवानगी घेण्यासाठी इतर कार्यालयांमध्ये हेलपाटे मारण्याची वेळ येणार नाही.’ या प्रणालीमुळे बांधकाम परवानगी प्रक्रियेदरम्यान वास्तूविशारदाचा आराखडा, भूमी अभिलेख आणि विकास आराखडा यांची पडताळणी करण्यासाठी लागणारा वेळ, मनुष्यबळ आणि वारंवार करावी लागणारी तपासणी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा दावा महापालिका प्रशासनाचा असल्याचे भिमाले म्हणाले.

या प्रकल्पासाठी प्रत्येक अर्जदाराकडून पाच हजार रुपये अर्ज शुल्क आकारण्यात येणार असून, बांधकाम क्षेत्रासाठी प्रतिचौरस फूट तीन रुपये शुल्क आकारले जाणार आहे. टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात ही प्रणाली लागू केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बाणेर आणि कोथरूड परिसरात हा पायलट प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यासंदर्भातील सामंजस्य करारानुसार (एमओयू) आवश्यक कार्यवाहीसाठी स्थायी समितीची मान्यता घेण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला होता. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिल्याने प्रकल्प राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी प्रत्येक अर्जदाराकडून पाच हजार रुपये अर्ज शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच बांधकाम क्षेत्रासाठी प्रति चौरस फूट तीन रुपये शुल्क आकारले जाणार आहे. या शुल्काची रक्कम पुणे महापालिका, भूमी अभिलेख विभाग आणि संबंधित तंत्रज्ञान कंपनी यांच्या संयुक्त ‘एस्क्रो’ बँक खात्यामार्फत व्यवस्थापित केली जाणार आहे.



### ‘एपीआय’ प्रणालीमुळे परवानगी प्रक्रिया सुलभ

**» महापालिकेने बांधकाम परवानगी प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता वाढविण्यासाठी भूमी अभिलेख विभागाच्या सहकार्याने ‘एपीआय’ आधारित प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रणालीद्वारे भूखंडाचे जिओ-रेफरन्सिंग, विकास आराखडा, डीपी झोनिंग आणि महसूल नोंदींची एकत्रित पडताळणी होणार आहे. अर्जदाराला प्रमाणित स्थानिक अहवाल ऑनलाइन उपलब्ध होणार असल्याने विविध कार्यालयांत हेलपाटे मारण्याची गरज कमी होईल. सुरुवातीला बाणेर आणि कोथरूड येथे पायलट प्रकल्प राबवून त्यानंतर संपूर्ण शहरात ही सुविधा टप्प्याटप्प्याने सुरू केली जाणार आहे.**

### अर्जदारांकडून शुल्क आकारणी कशी?

**» या नव्या प्रणालीअंतर्गत प्रत्येक बांधकाम परवानगी अर्जासाठी अर्जदाराकडून ५ हजार रुपये निश्चित शुल्क आकारले जाणार आहे. याशिवाय बांधकाम क्षेत्रानुसार प्रति चौरस फूट ३ रुपये अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. या शुल्काची रक्कम पुणे महापालिका, भूमी अभिलेख विभाग आणि संबंधित तंत्रज्ञान कंपनी यांच्या संयुक्त ‘एस्क्रो’ बँक खात्यात जमा होईल. या आर्थिक व्यवस्थेमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी पारदर्शक पद्धतीने करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असून पुढील टप्प्यात संपूर्ण शहरात ही शुल्क प्रणाली लागू केली जाणार आहे.**

### वास्तुविशारद आणि नागरिकांचा वेळ वाचणार

**» ‘जीआयएस-अॅज-अ-सर्व्हिस’ तंत्रज्ञानावर आधारित या प्रणालीमुळे वास्तुविशारदांचे आराखडे, भूमी अभिलेख आणि विकास आराखड्याची पडताळणी एका व्यासपीठावर होणार आहे. त्यामुळे कागदपत्रांची वारंवार तपासणी, मनुष्यबळाचा वापर आणि मंजुरीसाठी लागणारा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा महापालिका प्रशासनाचा दावा आहे. महापालिका आयुक्तांनी यापूर्वीच या कार्यपद्धतीला प्रशासकीय मान्यता दिली असून, स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.**

# पुण्यात गढूळ पाणी पुरवठा ! प्रशासनाने घेतला मोठा निर्णय

## स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांचे आदेश; जलशुद्धीकरण केंद्रांच्या आधुनिकीकरणासाठी 24 तासांत अहवाल सादर करण्याच्या सूचना.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणात गढूळ पाणीपुरवठा होत आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी महापालिका प्रशासनाकडे येत आहेत. गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी पाणी उकळून आणि गाळूनच प्यावे असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून केले जात आहे. गेल्या आठवड्यात पुणे शहर तसेच धरण साखळी परिसरात मुसळधार पाऊस झाला. यामुळे मागील काही दिवसांपासून शहरातील अनेक भागात गढूळ पाणी येण्यास सुरुवात झाली आहे. दरवर्षी पावसाला सुरुवात झाली की शहरातील काही भागात गढूळ पाणीपुरवठा होण्यास सुरुवात होते. मात्र यंदाच्या वर्षी हे प्रमाण अधिकच वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केला जात आहेत.

शहरातील अनेक भागात वाढलेल्या गढूळ पाणीपुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर तसेच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी पर्वती जलशुद्धीकरण केंद्राला संयुक्त भेट देऊन पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थायी समितीच्या बैठकीत नागरिकांना मिळत असल्याने गढूळ पाण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. त्यावेळी हॅलो शुद्धीकरण केंद्राला भेट देऊन पाहणी करण्याचे आदेश स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले होते. त्यानुसार प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यात खडकवासला धरणातील वाढलेल्या गढूळतेचा जलशुद्धीकरण प्रक्रियेवर नेमका काय परिणाम होत आहे, याचा प्रत्यक्ष आढावा या भेटीत घेण्यात येणार आहे.



### नागरिकांनी काय करावे?

**» महापालिका प्रशासनाने नागरिकांना गढूळ पाणी थेट पिणे टाळण्याचे आवाहन केले आहे. पाणी किमान १५ ते २० मिनिटे उकळून, गाळून किंवा योग्य फिल्टरचा वापर करूनच पिण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचा रंग, वास किंवा चव बदलल्यास तातडीने संबंधित क्षेत्रीय कार्यालय किंवा पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार नोंदवावी. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी दूषित पाणी वापरणे टाळावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

# पुणे विमानतळ पर्यायी रस्त्यासाठी महापालिकेने उचलले पाऊल !

## लोहगावमधील प्रस्तावित 'भारत मंडपम' सांस्कृतिक केंद्र प्रकल्पाला नव्या रस्त्याचा मोठा फायदा; महापालिका वर्तुळात चर्चांना उधाण

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव येथील विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यक ३० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादन करण्यास स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अंतर्गत सुमारे १५ हजार चौरस मीटर जागा ताब्यात घेतली जाणार असून, ३० कोटी ८३ लाख रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली. या भागात प्रस्तावित असलेल्या 'भारत मंडपम' प्रकल्पाला फायदा व्हावा, यासाठीच हा निर्णय घेतल्याची चर्चा पालिका वर्तुळात आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक झाली. यामध्ये लोहगाव विमानतळाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरणाच्या कामात संरक्षण दलाच्या हद्दीतील सध्या अस्तित्वात असलेला १२ मीटर रुंदीचा प्रवेशमार्ग बंद होईल. त्यामुळे नागरिकांना विमानतळाकडे जाण्यासाठी पर्यायी ३० मीटर रुंदीचा रस्ता तयार करणे आवश्यक आहे. यासाठी काही खासगी जागा ताब्यात घ्याव्या लागणार आहे. महापालिकेने यासाठी टीडीआर, एफएसआय देऊन जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र जमीन मालकांकडून प्रतिसाद न मिळाल्याने भूसंपादन करून जागा ताब्यात घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ अंतर्गत पर्यायी रस्त्यासाठी सुमारे १४ हजार ६२९.७६ चौरस मीटर जागेचे संपादन केले जाणार आहे. यासाठी सध्याच्या रेडिरेकनर दरानुसार सुमारे ३० कोटी ८३ लाख ९५ हजार ३४१ रुपयांच्या तरतुदीला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिल्याचे भिमाले यांनी सांगितले. भारतीय हवाई दलामार्फत लोहगाव विमानतळाचे विस्तारीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम सुरू आहे. या प्रकल्पामुळे विमानतळाकडे जाणारा संरक्षण दलाच्या हद्दीतील विद्यमान १२ मीटर रुंदीचा प्रवेशमार्ग बंद होणार आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतूक लक्षात घेऊन विमानतळासाठी पर्यायी ३० मीटर रुंदीचा रस्ता विकसित करणे आवश्यक असल्याचे महापालिका प्रशासनाने प्रस्तावात नमूद केले आहे.



### ३० मीटर रुंदीच्या पर्यायी रस्त्याला मंजुरी

» लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणामुळे सध्या संरक्षण दलाच्या हद्दीतून जाणारा १२ मीटर रुंदीचा प्रवेशमार्ग बंद होणार आहे. त्यामुळे विमानतळासाठी पर्यायी ३० मीटर रुंदीचा नवीन रस्ता विकसित करण्यास महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. या रस्त्यासाठी सुमारे १४,६२९.७६ चौरस मीटर खासगी जागेचे भूसंपादन करण्यात येणार आहे. भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन हा रस्ता विकसित करण्यात येणार असून विमानतळाकडे जाणाऱ्या नागरिकांना अधिक सुलभ आणि सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे.

### भूसंपादनासाठी ३०.८३ कोटींची तरतूद

» महापालिकेने नवीन भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत या रस्त्यासाठी आवश्यक जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरुवातीला टीडीआर आणि एफएसआयच्या माध्यमातून जागा मिळविण्याचा प्रयत्न झाला; मात्र जमीनमालकांकडून प्रतिसाद न मिळाल्याने थेट भूसंपादनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. या प्रक्रियेसाठी ३० कोटी ८३ लाख ९५ हजार रुपये खर्चास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. रेडीरेकनर दरानुसार नुकसानभरपाई देऊन संबंधित जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

### 'भारत मंडपम' प्रकल्पालाही चालना?

» लोहगावमधील सर्व्हे क्रमांक २३६ आणि २३८ मधील सुमारे ११.३१ हेक्टर जागेवर दिल्लीतील भारत मंडपमच्या धर्तीवर सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा प्रस्ताव यापूर्वीच मंजूर झाला आहे. नवीन ३० मीटर रस्ता तयार झाल्यास या प्रकल्पासह परिसरातील भविष्यातील विकास प्रकल्पांना मोठा फायदा होणार असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. त्यामुळे विमानतळासाठीचा हा रस्ता केवळ वाहतुकीसाठीच नव्हे, तर संपूर्ण परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# मुठा कालव्यातून दररोज सातशे क्युसेक पाण्याचा विसर्ग

## जलसंपदा विभागच देत नाही पिण्याच्या पाण्याला प्राधान्य; विसर्ग बंद करणे पुणेकरांसाठी महत्त्वाचे

**पुणे | प्रतिनिधी**


धरणांच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत झालेला अपुरा पाऊस, एल निनोचे असलेले संकट आणि शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा यामुळे सध्या शहरात पाणीकपात (२२ जुलैपर्यंत स्थगित) सुरू आहे. असे असले तरी जलसंपदा विभाग मात्र, नवीन उजव्या मुठा कालव्यातून दररोज ७०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग करत आहे.

एकीकडे पाणी कमी असताना कपातीचा सल्ला देणारा जलसंपदा विभागच हा विसर्ग करून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य न देता गेल्या आठ दिवसांपासून कालव्यातून सोडून देत आहे. हे पाणी शहराला रोज लागते त्याच्या दीडपट असून पाणीकपातीवर भर देण्यापेक्षा कालव्यातील विसर्ग बंद करणे हे पुणेकरांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.

यंदा पावसाळ्यात कमी पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने जानेवारीतच दिला होता. त्यानंतर जलसंपदा विभागाने एप्रिलमध्ये शहराच्या पाणीपुरवठ्यात 15 टक्के पाणीकपात करावी, असा सल्ला महापालिकेला दिला होता. त्या वेळी चारही धरणांमध्ये मिळून एकूण साठा 45 टक्के अर्थात 13.20 टीएमसी होता.

मात्र, महापालिकेने या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले. त्यावरून जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही महापालिकेने पाणीकपात करायला हवी, असे सांगून 15 ऑगस्टपर्यंत पाणी पुरविण्याची जबाबदारी महापालिकेचीच असल्याचे स्पष्ट केले.

त्यानंतर महापालिकेने 15 जूनपासून शहरात एक दिवसा आड पाणीकपात सुरू केली. त्याचा परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर झाला. उशिराने दाखल झालेल्या पावसाने जूनमध्ये हजेरी लावली नाही. मात्र, त्यानंतर 1 जुलैपासून सुरू झालेल्या दमदार पावसामुळे धरणांमध्ये पाण्याचा साठा सुरू झाला.



### दररोज ७०० क्युसेक विसर्ग कायम

» शहरात पाणीकपात सुरू असताना जलसंपदा विभागाने नवीन उजवा मुठा कालव्यातून दररोज ७०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू ठेवला आहे. ९ जुलैनंतर धरणांमधून नदीपात्रातील विसर्ग थांबविण्यात आला असला, तरी कालव्यातील पाणी सोडणे कायम ठेवण्यात आले. नागरिकांच्या मते, हे पाणी शहराच्या दैनंदिन गरजेपेक्षा सुमारे दीडपट असून, पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याऐवजी कालव्यातून मोठ्या प्रमाणात विसर्ग होत असल्याने पाणीकपातीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.